कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२१–२२/२५८१
दि. १०/०२/२०२२

**कृपया प्रसिध्दीसाठी**

कला अकादमीने रविंद्र भवन, साखळी येथे आयोजित केलेल्या मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धेत सादर होणारा ललितप्रभा नाट्यमंडळ, वळवई – फोंडा ह्या संस्थेचा विष्णु सुर्या वाघ लिखीत 'शिवगोमंतक' हा नाट्यप्रयोग आता गुरुवार, दि. १७ फेब्रुवारी २०२२ रोजी सायं. ७.०० वाजता निश्चित करण्यात आला आहे.

देशाचे गृहमंत्री श्री अमित शहा यांचा रविंद्र भवनला भेट देण्याचा कार्यक्रम आकस्मिक ठरल्यामुळे सुरक्षेच्या करणास्तव हा तात्काळ बदल करण्यात आला होता.

यंदाच्या मराठी 'ब' गट नाट्यस्पर्धेतील हा शेवटचा नाट्यप्रयोग असून या स्पर्धेचा निकाल गोवा विधानसभेच्या निवडणूकीसाठी लागू असलेल्या आचार संहितेचा कालावधी संपल्यानंतर जाहीर करण्यात येणार आहे, याची सर्व सहभागी नाटयसंस्था व नाट्यरसिक प्रेमींनी नोंद घ्यावी असे आवाहन कला अकादमीने केले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)